महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३२३ वा | दिनांक : ०५/११/२०२५ | वार : बुधवार

## अखेर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला

**मुंबई :** राज्यात गत अनेक वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल अखेर वाजला आहे. निवडणूक आयोगाने आज एका पत्रकार परिषदेद्वारे राज्यातील 246 नगरपरिषदा व 42 नगरपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार, या दोन्ही संस्थांसाठी येत्या 2 डिसेंबर रोजी निवडणूक होणार असून, त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 3 डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे.

या निवडणुकीत 1 कोटींहून अधिक मतदार मतदान करतील. या निवडणुका इलेक्ट्रॉनिक मशीन आणि बॅलेट युनिट वापरण्यात येतील, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.

**असा आहे निवडणुकीचा कार्यक्रम**

उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरूवात 10 नोव्हेंबर 2025, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत 17 नोव्हेंबर 2025, उमेदवारी अर्जांची पडताळणी 18 नोव्हेंबर 2025, अपिल नसलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत 21 नोव्हेंबर 2025, अपिल असलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत 25 नोव्हेंबर 2025, निवडणूक चिन्ह वाटप व अंतिम उमेदवार यादी जाहीर 26 नोव्हेंबर 2025, मतदानाचा दिवस 2 डिसेंबर 2025, मतमोजणी 3 डिसेंबर 2025, शासन राजपत्रात निकाल घोषित करण्याचा दिवस 10 डिसेंबर 2025

## निवडणुका उशिरा घेतल्या तर काय बिघडले असते? आमदार संजय गायकवाड



**बुलढाणा :** राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत आगामी स्थानी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींसंदर्भात माहिती दिली आहे. तसेच दुबार मतदार प्रश्नी देखील एक टूल तयार केले असल्याची निवडणूक आयुक्तांनी सांगितले आहे. परंतु, यावर देखील विरोधकांनी आक्षेप घेतला आहे. विशेष बाब म्हणजे निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवर शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी दुबार मतदारांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयावर मी समाधानी नसल्याचे म्हटले आहे. संजय गायकवाड म्हणाले, निवडणूक आयोगाने निवडणुका जाहीर केल्या आहेत मात्र, दुबार मतदारांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयावर मी समाधानी नाही. एकट्या बुलढाण्यात हजारो मतदारांची नावे दुबार आहेत, तर राज्यातील लाखो मतदारांकडून निवडणूक आयोग हमीपत्र घेणार आहे का? असा सवाल गायकवाड यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना संजय गायकवाड म्हणाले, दुबार मतदारांची नावे डिलीट केली असती तर बरे झाले असते आणि 10 दिवस निवडणुका उशिरा घेतल्या तर काय बिघडले असते? निवडणूक आयोगाच्या निर्णयावर मी समाधानी नाही. तसेच राज्यात महायुतीबाबत अद्यापही निर्णय झालेला नाही. जो चांगले काम करेल तो निवडणूक जिंकेल असेही गायकवाड म्हणाले.
दरम्यान, सध्या राज ठाकरे हे महाविकास आघाडीकडे वळताना दिसत आहेत. त्यांनी काढलेल्या मोर्चामध्ये महाविकास आघाडीचे सर्वच नेते उपस्थित होते. यावर प्रतिक्रिया देताना संजय गायकवाड म्हणाले, राज ठाकरे महाविकास आघाडीत आले तरी ग्रामीण भागात त्यांचा प्रभाव पडणार नाही. मात्र, मुंबई पुण्याकडे थोडाफार फायदा राज ठाकरेंमुळे महाविकास आघाडीला होऊ शकतो, असे गायकवाड म्हणाले.

## निवडणूक आयोग मालकाच्या सांगण्याप्रमाणे वागतंय : अनिल परब



**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात माहिती दिली. तसेच दुबार मतदार दुबार मतदारांचा प्रश्न सोडवण्यासाठी एक टूल तयार केले आहे. त्यानुसार, ज्या मतदारांची दुबार नावे आहेत, त्या ठिकाणी दोन स्टार्स असतील, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे. यावर आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी टीका केली आहे.

अनिल परब म्हणाले, आम्ही राज्य निवडणूक आयोगाकडे मतदार यादी स्वच्छ करून देण्याची मागणी केली आहे. स्वच्छ करून देणे म्हणजे ज्या मतदार यादीत घोळ आहे, ज्या मतदार यादीत दुबार मत आहेत, ज्या मतदार यादीत पत्ते चुकीचे आहेत, हे जे काही घोळ आहेत, म्हणजे आपण बघत आहोत की वडिलांचे नाव वेगळे आहे, एका घरात 40-50 मतदार नोंदवले गेले आहेत, अशी जी नावे आहेत, ही सगळी नावे गाळून आम्हाला मतदार यादी हवी आहे.

पुढे बोलताना अनिल परब म्हणाले, ते म्हणतात की दुबार मतदारांच्या नावावर स्टार करणार. स्टार करणार म्हणजे काय, त्या माणसाला विचारणार, आता ही माणसे यांना सापडणार कशी? याची प्रोसेस काय हे कोणालाही माहित नाही. कशा पद्धतीने याला रोखणार, याचे काहीच उत्तर नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाने काम पुढे रेटण्याचे काम केले आहे. या निवडणूक आयोगाचे जे मालक आहेत, भारतीय जनता पक्ष हे त्यांचा अजेंडा ठरल्याप्रमाणे राबवतील. हे फक्त लोकांच्या डोळ्याला पाणी लावण्याचे काम करत आहेत, की आम्ही अशी कारवाई करू, ते करू. मुळात कोणतीही कारवाई ते करणार नाही.

तसेच आता पुढील निर्णय काय करायचे हे महाविकास आघाडीचे नेते ठरवतील. आमचा निवडणुकीला विरोध नाही, आम्हाला फक्त मतदार याद्या दुरुस्त करून देण्यात यावी, एवढीच मागणी केली आहे. परंतु, निवडणूक आयोग ही यादी देण्यास कदाचित तयार नसल्याचे अनिल परब यांनी म्हटले आहे.

## तळपायाची आग मस्तकात गेली : निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवर राज ठाकरे संतापले



**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात माहिती दिली. तसेच दुबार मतदार दुबार मतदारांचा प्रश्न सोडवण्यासाठी एक टूल तयार केले आहे. त्यानुसार, ज्या मतदारांची दुबार नावे आहेत, त्या ठिकाणी दोन स्टार्स असतील, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे. निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरेंनी टीका केली आहे.

राज ठाकरे यांनी ट्विट करत म्हटले, आजच्या निवडणुका आयोगाच्या पत्रकार परिषदेची क्लिप मला कोणीतरी पाठवली. ती पाहून तळपायाची आग मस्तकात गेली! आणि आता 100 टक्के खात्री पटली की निवडणूक आयोग स्वायत्त आहे हे फक्त संविधानात आहे. हे सत्ताधाऱ्यांच्या हातचं बाहुलं आहे, अशी टीका त्यांनी केली आहे. दुबार मतदार नोंदणीपासून, ते मतदार यादीतील अनेक घोळ या सगळ्यावर एकही प्रश्न विचारल्यावर जर निवडणूक आयोगाला एकही उत्तर देता येत नसेल किंवा द्यायची इच्छा नसेल तर तुमचा उपयोग काय? जबाबदारी तर तुम्ही केंव्हाच झटकली आहेत, आत्ता उत्तरदायित्व पण नाकारणार, मग तुमच्या पदांच करायचं काय? असा संतप्त सवाल राज ठाकरेंनी केला आहे.

महाराष्ट्रातील जनतेने ही क्लिप जरूर पहा. तुमच्या मतदानाचा ढळढळीत अपमानाचा उगम कुठून आहे हे तुम्हाला कळेल. बाकी या पत्रकार परिषदेत प्रश्न विचारून निवडणूक आयोगाची भंबेरी उडवणाऱ्या पत्रकारांचं मनापासून अभिनंदन, अशी प्रतिक्रिया राज ठाकरेंनी दिली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ नोव्हेंबर २०२५


## स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज आसेगाव येथील विद्यार्थ्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड







**दौलताबाद (जावेद अहमद) :** राजे संभाजी सैनिकी स्कूल,कांचनवाडी पैठण रोड येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा स्तरीय मैदानी स्पर्धेत स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज आसेगावचा इयत्ता नववीचा विद्यार्थी आदित्य संतोष पऱ्हाड याने पाच किलोमीटर जलद चालण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे तो विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. क्रीडा प्रशिक्षक सागर मुगले यांनी विशेष परिश्रम घेतले या यशाबद्दल संचालक रत्नाकरजी फाळके, गीता फाळके , प्राचार्य योगेश फाळके, शिक्षक योगेश तंटक, नागेश लिंगायत, सत्यजित पवार, आदित्य घुगे, दुर्गेश कामथे, सागर मुगले, परमेश्वर उबाळे , अनिसा शेख, अर्चना थळपती, नम्रता थोरात, वैशाली बोर्डे, शोभा नागरे, सुनिता बहुरे, सुनिता वायाळ,सविता राजगुरू व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वागत करुन आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## भारतीय महिला क्रिकेट संघाला कला शिक्षकाचा अनोखा सलाम




**कन्नड (अरुण थोरात):** भारताच्या महिला क्रिकेट संघाने आरडब्ल्यूसी (World Cup) जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली. या अद्भुत विजयाने संपूर्ण देश आनंदात न्हाला आहे. क्रीडाप्रेमींपासून ते कला जगतापर्यंत सर्वत्र जल्लोष दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर कन्नड तालुक्यातील नेवपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे कला शिक्षक अमोल तागवाले यांनी महिलांच्या या भव्य विजयाचे अनोखे कौतुक करत अप्रतिम चित्र तयार केले आहे. श्रीतागवाले आपल्या कलेतून भारतीय महिला खेळाडूंच्या जिद्दीला, मेहनतीला आणि देशप्रेमाला सलाम केला आहे. क्रिकेटपटूंच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास, तिरंगा, ट्रॉफी आणि देशाचा अभिमान या सर्व गोष्टी त्यांनी कुंचल्यातून अत्यंत सुंदरतेने साकारल्या आहेत. त्यांच्या या चित्रकृतीने सामाजिक माध्यमांत मोठ्या प्रमाणात पसंती मिळवली असून विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि स्थानिक ग्रामस्थ त्यांचे मनापासून कौतुक करत आहेत.“खेळाडू मैदानात परिश्रम करतात; आम्ही कलाकार ब्रशद्वारे त्यांचा गौरव करतो,” असे भावनिक उद्गार तागवाले यांनी व्यक्त केले.महिला क्रिकेट संघाच्या शानदार परफॉर्मन्समुळे देशातील लाखो मुलींना नवे स्वप्न आणि प्रेरणा मिळाली आहे. अशावेळी शिक्षक तागवाले सारख्या शिक्षकांनी कला माध्यमातून दिलेला सन्मान हा निश्चितच उल्लेखनीय आहे.भारतीय महिला क्रिकेट संघाचे मन:पूर्वक अभिनंदन आणि अमोल तागवाले सरांना त्यांच्या या प्रेरणादायी कलाकृतीबद्दल ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## प्रा. विनोद गलांडे यांना 'लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार'



**शिरूर कासार (प्रतिनिधी) :** नेहरू युवा केंद्र बीड,भारत सरकार सलग्न क्रांती ग्राम विकास संस्था तथा विश्वनायक लोकसंसद फाउंडेशन,बीड- मुंबई आयोजित राज्यस्तरीय लोकसंसद जनप्रेरणा शिक्षक गौरव पुरस्कार-२०२५ चा हा राज्यस्तरीय सन्मान,आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालय, शिरूर (का.)जि. बीड येथे कार्यरत असणारे,प्रा.विनोद गलांडे यांना स्व.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सभागृह, मंत्रालयासमोर मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब व विश्वनायक लोकसंसद फाउंडेशनचे अध्यक्ष तथा संपादक सुरेश यादव यांच्या वतीने प्रा. विनोद गलांडे यांना स्मृतीचिन्हे, सन्मानपत्र,शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.हा सन्मान त्यांच्या कार्याचा, प्रेरणेचा, कौशल्याचा, आदर्शाचा, परिवर्तनाचा आणि सामाजिक सेवेचा आहे त्यांचे समाजाप्रती असलेले योगदान केवळ प्रेरणादायी नाही,तर देशाच्या जडणघडणीत मोलाचे स्थान निर्माण करणारे आहे.तसेच निसर्गातील,समाजातील, आपल्या सकारात्मक, प्रेरणादायी,विधायक,व उल्लेखनीय सेवा या कार्याबद्दल हा सन्मान लाख मोलाचा आहे,असे गौरवउद्गार विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी विद्यालयात झालेल्या सत्कार समारंभात काढले व गलांडे सरांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विश्वनायक लोकसंसद फाउंडेशनचे सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते मा.माऊली पानसंबळ,मा.गणेश गायके,मा शेख रियाज,मा.बाळासाहेब हरिदास यांनी प्राचार्य केशव भांगे साहेब यांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी विद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा.संजय काकडे प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.संजय आव्हाड, प्रा.नामदेव तरकसे प्रा. प्रशांत मळेकर, डॉ. आत्माराम झिंजुर्डे, श्री सुनील खेडकर विलास कांबळे तसेच विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ नोव्हेंबर २०२५


# आचारसंहितेची जत्रा

आचारसंहिता लागली की, गावभर हालचाल होते,
रात्री पक्ष बदलणारे पुन्हा सक्रिय होतात!
कालपर्यंत विरोधक, आज मिठी मारतात,
सत्तेच्या लोभात सारेच रूपांतरित होतात!

पाच वर्षे गायब नेते, आता पाया धरतात,
"तुमच्यासाठी काम केलं" म्हणत डोळे भरतात.
नकोशी माणसं आता नम्रतेचा मुखवटा घालतात,
मतांच्या लालसेने पुन्हा गावभर फिरतात!

तिकीट न मिळताच झेंडे बदलतात रात्री,
निष्ठा विकतात पैशांच्या गाठी!
कालचा "आपला" आज "परका" होतो,
राजकारणाचा हा खेळ दर पाच वर्षांनी नवा होतो!

स्थानिक प्रश्नांची कुणाला जाण नाही,
जनतेच्या वेदनेला कुठे स्थान नाही!
वचनं दिली तरी विसरतात सारे,
सत्ता आली की दार बंदच राहते बिचाऱ्या
जनतेसाठी!

आणि मग प्रश्न उरतो एकच रे —
पक्ष म्हणून मतदान केलं तर ते रात्रीच पक्ष बदलता,
नेता म्हणून मतदान केलं तर तेच नेता बदलता!
मग मतदाराने काय करायचं, हा विचार करायला हवा —
स्वतःच्या हितासाठी, आता "जनतेनेच नेते व्हायचं" ठरवायचं हवा!

**//काव्य रचना//**
**✍संदिप नानासाहेब वाकडे**
**रा.खेडा ता.कन्नड**
**9766992776**

# कोल्हापुरी बंधारे ठरताहेत शेतकऱ्यांसाठी घातक, शेतकऱ्यांवर जीवघेणे संकट



**कन्नड (अरुण थोरात) :** परतीच्या पावसानं सर्वत्र धुमाकुळ घातला. नदीनाले एक झाले. शेतीचे प्रचंड नुकसान झाले. नदीपात्राने प्रवाह बदलले. नदीकाठच्या जमिनी खरडून गेल्या. प्रचंड वाळू उपसा, नदीकाठची वृक्षतोड, थडी ची झालेली भयंकर अवस्था. नदीवर ठिकठिकाणी केटीवेअर बांधले आहे. ते फक्त शोभेच्या वास्तू झाल्या आहेत. त्याला निट गेट बसवले जात नाही. त्याच्या देखभालीसाठी पैसा नाही. दरवर्षी गेट काढावे लागतात, पुन्हा टाकावे लागतात. मात्र याचे व्यवस्थापन होत नाही. शासनाला वाटते हे काम ग्रा. पंचायतीचे आहे. ग्राम पंचायतीला वाटते हे काम शासनाचे आहे. त्यामुळे या गेट मध्ये झाडे किंवा गवत अडकून प्रवाह कोंडतो, त्यामुळे पाण्याचा प्रवाह बदलून शेतीत घुसतो. शेती पीकासह वाहून जाते. नदी काठच्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व ती शेती कशी भराव टाकुन तयार करावी. असे ठिकठिकाणी झाले आहे. थोडा पाऊस जास्त झाला की हे होतात. संबंधित विभागाने सर्वच केटीवेअर बंधाऱ्यांची दुरुस्ती करून नदीकाठ मजबूत करण्यासाठी साईटने संरक्षक भिंत घालावी. भरमसाट वाळू उपशामुळे हे सर्व होत आहे. याकडे ना शासनाचे लक्ष ना ग्रामस्थांचे. असे केवळ शोभेचे वस्तू झालेल्या सर्व नदीवरील बंधारे यांच्या व्यवस्थापनासाठी बजेट दिले जावे. किंवा कर्मचारी नियुक्त असावे. सुखना नदीवरही असे प्रकार ठिकठिकाणी झालेले आहे. यासाठी पुन्हा नव्याने सर्वच बंधाऱ्याचे ऑडिट होणे आवश्यक आहे. दरवर्षी हे दृश्य परिणाम पहावयास मिळते. शेतकऱ्यांसमोर हे फार मोठे संकट उभे राहिले आहे. तुटपुंजी नुकसान भरपाई शेतकऱ्यांची जमिन परत मिळवून देईल का ?या समस्येसंदर्भात शासनाकडे सविस्तर अहवाल सादर करणार असून या समस्येकडे लक्ष वेधणार आहोत. अन्यथा हे असेच राहिले तर नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या जमिनी शिल्लक राहणार नाही. आगामी काळात याची दखल न घेतल्यास सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती व्यापक जन आंदोलन करील. ज्या नदीवर असे कोल्हापुरी बंधारे आहेत त्या नदीकाठच्या शेतकऱ्यांनी शासन व प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब लेखी स्वरूपात निवेदन देवून लक्ष वेधावे. त्यासाठी ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी ही पुढाकार घ्यावा. असे आवाहन सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे यांनी केले आहे.

# खारीच्या वावरात

खारीच्या वावरात
आज हरभरा फुलला
रूप गोजीर शोभले
ज्वारीसोबत कांद्याला

ओंब्या लागल्या गव्हाला
आम आली हरभरा
फुलं लागता तयाला
घाटे येई भरभरा

गेली फुटून कपाशी
सारी सरली वेचणी
येता कापूस घरात
हर्ष मावेना अंगणी

अशी माझी काळी माय
अन्नपूर्णा लेकरांची
जरी नाव तिचे खारी
तीच आधार घराची

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
**मो. ९४०३३८४८८९**






# श्रीमती पुष्पादेवी वैजनाथराव देशमुख यांचे निधन



**वरपगाव :** वपरगाव (तालुका केज जिल्हा बीड) चे भूमिपुत्र व महाराष्ट्र राज्याच्या पाटबंधारे विभागातून (सध्याचा जलसंपदा विभाग) अधीक्षक अभियंता (सुप्रिंटेंडिंग इंजिनियर) म्हणून सेवानिवृत्त झालेले कै. वैजनाथराव हनुमंतराव देशमुख यांच्या पत्नी श्रीमती पुष्पादेवी वैजनाथराव देशमुख यांचे सोमवार दिनांक 3 नोव्हेंबर 2025 रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले. त्या 82 वर्षाच्या होत्या. त्या अत्यंत कुटुंबवत्सल व प्रेमळ होत्या. वरपगाव व परिसरातील अनेकांना त्यांनी नोकरी व व्यवसायासाठी खूप प्रोत्साहन दिले तसेच आवश्यकतेनुसार मदत, सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे त्यांच्या निधनाचे वृत्त समजतात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या मागे पुणे येथे स्थित मुलगा निवृत्त वैद्यकीय अधिकारी बालरोगतज्ञ व सध्या कृषी व बांधकाम क्षेत्रात कार्यरत डॉ. अविनाश देशमुख तसेच नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे स्वतःचे इंग्लिश मीडियम स्कूल असलेले आणि स्वतःच्या सुसज्ज हॉस्पिटलच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेले सुप्रसिद्ध जनरल फिजिशियन डॉ. राहुल देशमुख अशी दोन मुले, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा तिसरा मुलगा कै.अतुल देशमुख हा पुणे येथे बांधकाम व्यवसायात होता त्याचे गतवर्षी निधन झाले. कैलासवासी पुष्पादेवी देशमुख यांचे संपूर्ण कुटुंब सुशिक्षित असून एक नातू डॉक्टर, तीन नातू इंजिनीयर तर दोन नाती आर्किटेक्ट आहेत.

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री माननीय आमदार श्री प्रकाश दादा सोळुंखे यांच्या त्या मावशी होत तर शेतकरी कामगार पक्षाचे दिवंगत नेते भाई उद्धवराव पाटील यांची कन्या त्यांची स्नुषा आहे.अशा राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींशी कौटुंबिक नातेसंबंध असलेल्या कै. पुष्पा देवी देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ नोव्हेंबर २०२५

## ज्यांच्या कडे पुरावा असेल तो कुणबी पण ज्यांच्या कडे पुरावाच नाही त्या मराठ्यांचे काय




**मुंबई (प्रतिनीधी)** सरसकट मराठा समाजाला आरक्षण मिळाल्या शिवाय मुंबई सोडायची नाही. सगळी कडे एकच चर्चा होती की,27 तारखेला गणपती स्थापना होते आणि नेमकी 29 तारखेला मोर्च्याची तारीख निश्चित केली होती..तीच तारीख का निश्चित केली ? व कशा साठी निश्चित केली गेली ? हे मात्र उघड परंतु असलेले अनुत्तरीत आहे त्यामुळे आता प्रचंड मोठा प्रश्न आहे की" ज्यांच्या कडे पुरावा असेल तो कुणबी पण ज्यांच्या कडे पुरावाच नाही त्या मराठ्यांचे काय?" देशाची आर्थिक राजधानी मुंबई आणि महाराष्ट्रा चीही राजधानी मुंबईच आहे.मुंबईतील सर्वात मोठा उत्सव म्हणजे गणेश उत्सव असतो. सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र येऊन हा उत्सव अत्यंत भक्ती भावाने आणि आनंदाने साजरा करतात आणि अशा स्थितीत कायदा सुव्यवस्था पाहता शासना विरुद्ध कोणी न्यायालयात गेले तर आंदोलन जास्त दिवस चालू ठेवता येणार नाही.राज्य शासनाच्या ब्रिफींग कमिटीवर आणि शासनाच्या वकिलांच्या पॅनल वर जाण्याची आत्मिक इच्छा असणाऱ्यांनी पुर्ण कायदेशीर खेळ खंडोबा केला अयोग्य आणि कायद्यात टिकू शकणार नाहीत हे सल्ले ज्यांना कोणाला द्यायचे ते दिले त्यांनी पण,काही एक विचार न करता " आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे, " देत कसे नाही घेतल्या शिवाय राहात नाही " याचा परिणाम अख्खा मराठा समाज अनुभवत आहे. सरसकट मराठा समाजाला कुणबी संबोधून (ओबीसीतून ) कायदेशीर आरक्षण सरकार देऊ शकणार नाही आणि राजकीय इच्छाशक्ती नसल्याने मिळणारही नाही. ही साधी गोष्ट समजून घेणं महत्वाचं होतं हे आम्ही काही वर्षापूर्वीच स्पष्ट पणे नमुद केले होते.पण परिणाम शून्य! सरकारला नेहमी प्रमाणे या वेळी दीर्घ तीन महिने मुदत द्यायचं कारण काय..? हे सुद्धा सगळ्यांना कळले पण ब्रिफींग सेना मुग गिळून बसली होती. तारीख वर तारीख देत घेत अडीच वर्ष गेले पण सर सकट मराठा समाजाला आरक्षण काही मिळाले नाही,आज पर्यंतच्या असंख्य कायदेशीर न्याय निवाडे पाहीले तर त्या नुसार कोणतेही गॅजेट लागू करून सरसकट मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण देता येत नाही हेच सिद्ध झालेले आहे परंतु शासनाच्या ब्रिफींग कमिटी वर जाऊ पाहणारी ब्रिफींग सेनाहे सत्य कोणाला सांगतच नाही. कायदेशीर बाब समजणं गरजेचं होते, सरकारने नवीन काही दिलं नाही.फक्त नोंदी शोधणे सोपे केल आहे एवढेच सर्वच पक्ष स्पष्ट पणे अनेक वर्षा पासून वारंवार सांगत होते की,आम्ही कोणाच्या ही आरक्षणाला धक्का लावणार नाही.जवाब दो आंदोलनात राजकीय नेते व इतर सर्वांनी कबुली दिली हे " ब्रिफींग सेनेला " माहीत नव्हते काय ? तर मग सांगा असाकायदा जर महाराष्ट्र शासनाला करायचा असेल तर "ओबीसी आणि मराठा "या विभागणी मध्ये दोन तृतीयांश बहुमत प्राप्त करून कायदा कसा बनणार?आंदोलन,शक्ती प्रदर्शन, दौरे यावर खर्च करण्या पेक्षा अतिरिक्त आरक्षणाला व त्या वेळेसच्या सर्वच जीआर ला कोर्टात चॅलेंज करून खुप मोठ्या प्रमाणात प्रश्न सुटला असता पण इथेही ब्रिफींग सेना शांत राहिली,म्हणुन हाच प्रश्न सतत पुढे येणार आहे की, " ज्याच्या कडे पुरावा असेल तो कुणबी होईल पण ज्याच्या कडे पुरावाच नाही त्या मराठ्यांचे काय? " म्हणुन मागण्यांचे दोन भाग करावे लागणार असून ज्यात पुरावे असणारे कुणबी व नसणारे एसईबीसी. एस ई बी सी हे दिलेलं आरक्षण टिकवायचे असेल तर केंद्रातून आरक्षणाची मर्यादा वाढवून घेतल्या शिवाय पर्याय नाही हे सातत्याने आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील नमुद करत आहेत.राज्य शासनास क्युरेटिव्ह पिटीशन जिंकावी लागेल पण त्याची ही काही एक तयारी राज्य शासना कडून दिसत नाही.या सर्व राजकीय पक्षांच्या इच्छा शक्तीचा विचार करून,व कायदेशीर अभ्यास करूनच सगळ्यांनी अनेक वर्षा पासुन मागणी केली होती. केंद्रातून आरक्षणाची मर्यादा वाढवा ! मराठा आरक्षणाचे सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील मराठा समाजाच्या वतीने हस्तक्षेप याचीकाकर्ते जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांच्या विचारांशी सहमत होऊन अनेक ठिकाणी कार्यशाळा होऊन पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन (पी पी टी) द्वारे कायदेशीर तरतुदी लक्षात आणुन दिल्या त्यानुसार मराठा महासंघानी दिल्ली मध्ये याच मागणी चा पाठ पुरावा आंदोलन सुद्धा केलं होते." कुणबी पुरावे असणारे यांना पुरावे सादर केल्यावर कुणबी प्रमाणपत्र मिळणारच आहे." मात्र काहीच पुरावे नसणाऱ्या उर्वरीत मराठा समाजाला कायम स्वरूपी टिकणारे आरक्षण मिळवण्या साठी केंद्रातून आरक्षणाची मर्यादा वाढवून घेणे हाच तज्ञ अभ्यासाकांनी सुचवलेला अंतिम पर्याय उरला आहे.आणि त्या संदर्भात लवकरच निर्णय घेऊन योग्य प्रकारे वाटचाल केली जाईल. म्हणुन चला तर सगळ्यांनीच सहभागी होऊन समाजोन्नती प्रक्रियेचा भाग व्हावे असे आवाहन अखंड भारत मराठा साम्राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र शेडगे,सातारा मुंबई,संतोष दळवी मावळ पुणे,सुभाष देसाई कोल्हापूर,कृष्णत नलावडे माण सातारा, दत्ता शेळके,व्यासदेव पवार,प्रकाशभाऊ जगताप फलटण, श्रीपाद सपकाळ सातारा, गोपाळ चोपडे बुलढाणा, शिवाजी उगले जालना, नाना भिंताडे, पोपट भिलारे, संदीप ऐजरे,संतोष चव्हाण पुणे, कैलासराव पाटील मुंबई, आनंदराव भोसले कोल्हापूर, मधुकर कोडक मुंबई,अशोक शिंदे अहिल्यानगर, जितेंद्र भाई रांजने,जालिंदर वंडेकर, विजय वंडेकर,आळेफाटा, राजेश देशमुख नाशिक, चंद्रकांत शेळके, अनिल संकपाळ जगन्नाथ उदुगडे, वैभव बागल सांगली, कविता ताई शिंदे, खटाव, अर्जुन पिसाळ सातारा, संभाजी जाधव नांदेड, प्रदीप कोरडे हवेली, प्रकाश तरटे आटपाडी सांगली, संतोष मोहीते कडेगाव सांगली,राज सस्ते,अक्षय घाडगे सांगली, प्रथमेश पवार सातारा, हेमचंद्र नलवडे पुणे, रुपेश मांजरेकर कोकण मुंबई,दिनेश धार पवार कोकण मुंबई,दाजी बालुगडे,अंतूश कांबळे, हर्षदाताई कडू आदींनी केली आहे.

## पदवीधरांना विना विलंब शुल्क पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणार

**छत्रपती संभाजीनगर** : डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची व्यवस्थापन परिषदेची बैठक आज दिनांक 3 नोव्हेंबर रोजी पार पडली. आज झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये डॉ गजानन सानप यांनी छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा पदवीधर मतदारसंघ 2026 नोंदणी प्रक्रिया सुरू असून त्याच्या पहिल्या टप्प्यामध्ये नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या दोन विद्यापीठ परीक्षेत्रातील आठ जिल्ह्यांमधील पदवीधरांना आपल्या प्रश्नांसाठी लढणारा, न्याय देणारा, आपला प्रतिनिधी निवडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी जास्तीत जास्त पदवीधरांनी मतदान नोंदणी करून लोकशाहीचा पाया मजबूत करावा व या मतदारसंघात नोंदणी करावी यासाठी त्यांना मुख्यतः पदवी प्रमाणपत्रांची आवश्यकता असते ते पदवी प्रमाणपत्र बऱ्याच विद्यार्थ्यांचे वर्षानुवर्ष विद्यापीठात पडून राहते अथवा त्यावर असणाऱ्या दंडाच्या शुल्कामुळे विद्यार्थी ते काढत नाहीत. विद्यापीठाद्वारे आज घेण्यात आलेल्या या विद्यार्थीभिमुख निर्णयामुळे विद्यार्थ्यांना आपली शैक्षणिक पदवी प्रमाणपत्र काढता येईल व या प्रमाणपत्राच्या आधारे पदवीधर मतदारसंघांमध्ये नोंदणी करता येणार आहे.सदरील विलंब शुल्कांची माफी व्हावी यासाठी विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ गजानन सानप यांनी माननीय कुलगुरू महोदयांना त्या स्वरूपाचे निवेदन दिले होते.त्या अनुषंगाने आज झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये पदवी प्रमाणपत्रासाठी चे विलंब शुल्क माफ करण्याचा ठराव डॉ गजानन सानप यांच्याद्वारे मांडण्यात आला सदरील ठरावास श्री काशिनाथ देवधर, डॉ योगिता होके पाटील, डॉ व्यंकटेश लांब, डॉ अपर्णा जीगे पाटील यांनी अनुमोदन दिले.त्यामुळे येत्या 31 जानेवारी 2026 पर्यंत विद्यापीठातून आत्तापर्यंत पदवी न घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची पदवी विनाविलंब शुल्क प्राप्त करता येणार आहे.जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपले पदवी प्रमाणपत्र प्राप्त करावे व त्यासोबतच मराठवाडा पदवीधर मतदारसंघांमध्ये नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रा. डॉ. जगदीश ननवरे यांना मातृशोक

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयातील गणित या विषयाचे प्राध्यापक आणि डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. जगदीश ननवरे यांच्या मातोश्री सौ.जनाबाई अश्रुबा ननवरे यांचे काल रात्री दु:खद निधन झाले. प्रा. डॉ. जगदीश ननावरे यांना या अतीव दु:खातून सावरण्यासाठी महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी प्रार्थना केली. मृत्युसमयी त्यांच्या मातोश्री ९३ वर्षाच्या होत्या. अतिशय बिकट परिस्थितीतून व कष्टातून त्यांनी आपला संसार उभा केला आणि आपल्या मुलांचा शिक्षण देऊन त्यांना उच्चशिक्षित केले.त्या माया आणि ममत्वाचे प्रतीक होत्या. अत्यंत मायाळू स्वभावासाठी प्रसिद्धः होत्या. त्यांचा अंत्यविधी आज दिनांक ०५/११/२०२५ रोजी देगाव ता. केज जिल्हा बीड या त्यांच्या मूळ गावी होणार आहे. त्यांच्या पश्चात मुले , मुली नातवंडे असा परिवार आहे.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ नोव्हेंबर २०२५

# भारतीय महिला क्रिकेटचा सुवर्ण विश्वविजय : राष्ट्रगौरवाचा ऐतिहासिक क्षण

भारतीय क्रीडा इतिहासात 2025 हे वर्ष सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल, कारण भारतीय महिला क्रिकेट संघाने प्रथमच विश्वचषक (Women’s Cricket World Cup 2025) आपल्या नावावर करत संपूर्ण राष्ट्राचा अभिमान उंचावला आहे. या विजयानं केवळ एका स्पर्धेचं पारितोषिक जिंकण्यात अर्थ नाही, तर भारतीय स्त्रीशक्तीने जागतिक पटलावर आपली ओळख, सामर्थ्य आणि क्रीडाजिद्द किती उंचावली आहे, याचे प्रतीक आहे. मुंबईमध्ये पार पडलेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने प्रतिस्पर्धी दक्षिण आफ्रिका महिला संघाला पराभूत करून जेतेपद पटकावले आणि जगभरात भारतीय महिलांच्या क्रीडाप्रतिभेचा गौरवशाली नाद घुमवला. या विजयाने देशात साजरा होणारा उत्सव केवळ क्रीडाजगतातील आनंद नसून, सामाजिक परिवर्तनाचे, लिंगभाव समतेचे आणि स्त्री सक्षमीकरणाचे सजीव दर्शन आहे.भारतीय महिला क्रिकेटचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. काही दशकांपूर्वीपर्यंत महिलांसाठी क्रिकेट हा केवळ ‘पुरुषांचा खेळ’ मानला जायचा. समाजातील पारंपरिक विचारसरणी, खेळात गुंतवणूक करण्याची असमानता, प्रशिक्षण व साधनांची कमतरता आणि कौटुंबिक बंधने या साऱ्या अडथळ्यांमधून भारतीय महिला खेळाडूंनी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाने आपला मार्ग स्वतः तयार केला. मिताली राज, झुलन गोस्वामी, हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, शफाली वर्मा, दीप्ती शर्मा यांसारख्या खेळाडूंनी भारतीय महिला क्रिकेटला ज्या उंचीवर नेले, ती आज जगाच्या क्रीडाक्षेत्रात गौरवाने स्मरणात ठेवली जाईल. त्यांचं योगदान केवळ खेळापुरतं नाही, तर सामाजिक मानसिकतेत बदल घडवण्याचं काम त्यांनी केलं आहे.2025 च्या या विजयानं अनेक वर्षांचा संघर्ष, धैर्य आणि सामूहिक प्रयत्नांचा परिपाक साधला आहे. या संघाने केवळ क्रिकेट खेळलं नाही, तर त्या खेळात राष्ट्रभावनेची जाणीव आणि स्त्री सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहिला. भारतीय महिला क्रिकेट संघाने या विश्वचषकात दाखवलेला एकजूटपणा, तांत्रिक परिपक्वता आणि मानसिक ताकद हा भारतीय क्रीडा व्यवस्थेच्या नव्या युगाचा संदेश आहे. अंतिम सामन्यातील हरमनप्रीत कौरची कप्तानी, शफाली वर्मा, स्मृती मंधानाची, संयमी खेळी आणि दीप्ती शर्माचा ऑलराउंड परफॉर्मन्स यांनी भारतीय संघाला अविजेय बनवले. या विजयामागे प्रशिक्षक मंडळ, सहाय्यक कर्मचारी, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रत्येक खेळाडूची देशासाठी खेळण्याची प्रेरणा आहे.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भारतीय महिला क्रिकेट संघाचा हा विजय स्त्री सक्षमीकरणाच्या प्रगत टप्प्याचे प्रतीक आहे. भारतात दशकानुदशके लिंगभाव असमानता ही सामाजिक समस्या राहिली आहे. शिक्षण, रोजगार, राजकारण आणि खेळ या सर्व क्षेत्रांत महिलांना समान संधी मिळवण्यासाठी दीर्घ संघर्ष करावा लागला. पण या विजयानं स्त्रिया केवळ ‘दुसऱ्या क्रमांकावर’ राहणारी व्यक्ती नाहीत, तर त्या नेतृत्व करू शकतात, संघाला विजयाकडे नेऊ शकतात, राष्ट्राचा अभिमान बनू शकतात, हे जगाला दाखवून दिलं आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाचा विजय म्हणजे लिंगभाव समतेचा विजय आहे.क्रिकेट हा भारतात धर्मासारखा मानला जाणारा खेळ आहे. दीर्घकाळ तो पुरुषप्रधानतेच्या पिंजऱ्यात अडकलेला होता. पण 2025 च्या या विश्वचषकानंतर त्या चौकटी तुटल्या आहेत. भारतीय महिलांनी दाखवून दिलं की क्रिकेटवरील अधिकार कोणाचाही एकाधिकार नाही; प्रतिभा, मेहनत आणि जिद्द असली की मैदानावर कोणीही चमत्कार घडवू शकतो. या विजयानं ग्रामीण भागातील, लहान शहरांतील आणि आर्थिकदृष्ट्या मर्यादित कुटुंबातील मुलींना नव्या स्वप्नांची प्रेरणा दिली आहे. समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार, अशा क्रीडाविजयांमुळे सामाजिक समता आणि आत्मसन्मानाची भावना व्यापक स्तरावर वाढते. ही केवळ खेळाची जिंक नाही, तर सामाजिक मानसिकतेची झेप आहे.भारतीय महिला क्रिकेटचा विकास हा केवळ खेळाडूंच्या प्रयत्नांमुळे नाही, तर मागील काही वर्षांत झालेल्या संरचनात्मक बदलांमुळे शक्य झाला. भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळाने (BCCI) महिला क्रिकेटसाठी स्वतंत्र गुंतवणूक, करार आणि सुविधा निर्माण केल्या. महिला IPL (WPL) च्या स्थापनेनं महिला खेळाडूंना व्यावसायिक मंच उपलब्ध झाला. माध्यमांनीही महिला क्रिकेटकडे गांभीर्याने पाहायला सुरुवात केली. या सगळ्यामुळे महिला खेळाडूंना आत्मविश्वास मिळाला आणि समाजात त्यांच्या कार्याची दखल घेण्याची प्रवृत्ती वाढली.या विजयानं देशात सर्व स्तरांवर स्त्री सक्षमीकरणाबद्दल सकारात्मक संदेश दिला आहे. ग्रामीण मुलींना वाटू लागलं आहे की क्रीडांगणही त्यांच्या स्वप्नांची पूर्ती करू शकतं. महिला खेळाडू आता केवळ ‘प्रेरणास्थान’ नाहीत, तर त्या समाजातील बदल घडवणाऱ्या ‘प्रेरक शक्ती’ बनल्या आहेत. या विजयामुळे मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलतो आहे, कारण समाजात आदर्श निर्माण झाला आहे की मुलगीने जर ठरवले, तर तीही आकाशाला गवसणी घालू शकते.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अशा विजयांमुळे समाजात लिंगभेदावर आधारित रूढी मोडतात. स्त्रियांच्या क्षमतांबद्दलच्या पूर्वग्रहांचा भंग होतो आणि पुरुषसत्ताक मानसिकतेला जबाबदार प्रश्न विचारले जातात. महिला क्रिकेट संघाचा हा विजय म्हणजे भारतीय समाजाच्या बदलत्या मानसिकतेचं दर्शन आहे. जिथे स्त्रीला आता ‘कमकुवत’ म्हणून नव्हे, तर ‘समान योगदानकर्ती’ म्हणून ओळख दिली जाते.या विजयानं भारतीय तरुण पिढीला नवी प्रेरणा मिळाली आहे. शाळा-महाविद्यालयांतील क्रीडा स्पर्धांमध्ये मुलींचा सहभाग वाढेल, महिला प्रशिक्षक आणि क्रीडा प्रशासक निर्माण होतील, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे क्रीडा क्षेत्रातील लैंगिक समानतेचं स्वप्न आता प्रत्यक्षात येईल. क्रीडांगणावर महिलांची उपस्थिती म्हणजे समाजातील समतोल शक्तींचं प्रतिनिधित्व आहे.भारतीय महिला क्रिकेट संघाच्या या कामगिरीनं राष्ट्राला आत्मगौरवाचा नवा अनुभव दिला आहे. पंतप्रधानांपासून ते सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांनी या विजयाचं कौतुक केलं. भारतीय तिरंग्याखाली उभ्या राहिलेल्या त्या अकरा-पंधरा योद्ध्या आज प्रत्येक भारतीय मुलीच्या प्रेरणेचं प्रतीक बनल्या आहेत. हे केवळ क्रीडाजगतातील जेतेपद नाही, तर सामाजिक समतेचं, आत्मसन्मानाचं आणि प्रगत भारताचं द्योतक आहे.भारतीय समाजशास्त्रात ‘सामूहिक प्रेरणा’ ही संकल्पना महत्त्वाची आहे. जेव्हा एखाद्या समाजगटाचं यश संपूर्ण समाजाला उभारी देतं. महिला क्रिकेट संघाचा विजय तसाच आहे. तो केवळ खेळाचा नव्हे, तर भारतीय स्त्रीच्या आत्मबळाचा उत्सव आहे.या विजयाच्या निमित्ताने प्रत्येक भारतीयाने या संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले पाहिजे. कारण त्यांनी दाखवून दिलं की संधी मिळाल्यास भारतीय महिला कोणत्याही क्षेत्रात जगावर राज्य करू शकतात. त्यांनी राष्ट्राला नवा आत्मविश्वास, नवी ऊर्जा आणि नवा अभिमान दिला आहे. त्यांचं हे यश पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल.अखेर सांगावसं वाटतं की भारतीय महिला क्रिकेट संघाचा 2025 विश्वचषक विजय हा केवळ एका खेळाचा गौरव नाही, तर भारतीय समाजाच्या प्रगत वाटचालीचा मैलाचा दगड आहे. या विजयानं सिद्ध केलं आहे की समतेच्या मैदानावर स्त्रिया केवळ स्पर्धक नाहीत, तर नेतृत्वकर्त्या आहेत. या विजयाने भारतातील प्रत्येक घरात, प्रत्येक मुलीच्या डोळ्यांत स्वप्न पेटलं आहे ते स्वाभिमानाचं, आत्मनिर्भरतेचं आणि राष्ट्रगौरवाचं. भारतीय महिला क्रिकेट संघाचे अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा..!



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. - 9960103582**
**bagate.rajendra5@gmail.com**

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०५ नोव्हेंबर २०२५

# गुरु नानक देव : मानवता आणि सामाजिक समतेचे प्रवर्तक

**भा**रतीय संत परंपरेत अनेक थोर पुरुषांनी समाजाच्या उद्धारासाठी कार्य केले, पण त्या परंपरेतील सर्वात तेजस्वी आणि मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे गुरु नानक देव होते. त्यांनी धर्माला पंथ, जाती, विधी यांच्यापलीकडे नेऊन तो समाजकल्याणाशी जोडला. त्यांच्या विचारसरणीत माणुसकी, समानता, सेवा, प्रेम, श्रमसन्मान आणि न्याय यांचे अद्भुत मिश्रण आहे. त्यांचे जीवन हे केवळ धार्मिक क्रांतीचे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे घोषणापत्र ठरले. आजच्या काळातही त्यांची शिकवण समाजाला नवा नैतिक मार्ग दाखवते. गुरु नानक देव यांचा जन्म तळवंडी या गावात झाला, ज्याला आज ननकाना साहिब (पाकिस्तान) म्हणून ओळखले जाते. त्या काळात भारतीय समाज धर्माच्या नावाखाली विभागला गेला होता. जातिभेद, अंधश्रद्धा, स्त्रीदमन, शोषण आणि असमानता यांचे सावट संपूर्ण समाजावर पसरलेले होते. धर्म हा व्यवहाराच्या केंद्रस्थानी होता, पण त्याचा वापर लोकशोषणासाठी होत होता. अशा वेळी एका बालकाने समाजाला सांगितले की 'ना को हिंदू, ना को मुसलमान' म्हणजेच प्रत्येक मनुष्य सर्वप्रथम एक मानव आहे. हे वचन त्या काळातील धार्मिक संकुचिततेवर प्रहार करणारे आणि समाजाला नव्या दिशेने नेणारे होते.गुरु नानक देव यांचे बालपण शांत, करुणामय आणि चिंतनशील वातावरणात गेले. लहानपणापासूनच त्यांना सामाजिक अन्याय, गरीबी, आणि धर्माच्या नावाखाली होणारे अत्याचार जाणवले. त्यांनी देवाला शोधण्याची प्रक्रिया बाह्य पूजापद्धतीत नव्हे, तर अंत:करणातील शुद्धतेत शोधली. त्यांनी धर्माला मनुष्याच्या आचरणाशी जोडले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे सत्याचा शोध, इतरांविषयी करुणा, प्रामाणिक श्रम आणि सामूहिक कल्याणासाठीची सेवा होय. त्यांची मूलभूत शिकवण तीन शब्दांत सांगता येते ते म्हणजेच नाम जपो, किरत करो आणि वंड छको. या तत्त्वांमध्ये समाजजीवनाची संपूर्ण दिशा अंतर्भूत आहे. नाम जपो म्हणजे सतत सत्य आणि परमात्म्याचे स्मरण, म्हणजेच अंत:करणातील शुद्धता; किरत करो म्हणजे प्रामाणिक श्रम करा, म्हणजेच जीवनात परिश्रम आणि स्वावलंबनाचा सन्मान करा; तर वंड छको म्हणजे आपल्या उत्पन्नातील काही भाग इतरांसोबत वाटून घ्या, म्हणजेच समाजातील दुर्बल घटकांविषयी जबाबदारी बाळगा. या शिकवणुकीत आर्थिक समता, सामाजिक न्याय आणि नैतिकतेचा सुंदर संगम दिसतो. हे तीन तत्त्व आजच्या समाजातही तितकेच उपयुक्त आहेत.गुरु नानक देव यांनी समाजातील जातिभेदाचा तीव्र निषेध केला. त्यांच्या काळात समाजात 'उच्च' आणि 'नीच' यांच्यातील दरी फारच खोल होती. अस्पृश्यतेने माणसामाणसात भिंती उभ्या केल्या होत्या. पण त्यांनी शिकवले की 'सब मे जोत, जोत है सोई; तिस का चानण सब मे होई.' म्हणजे प्रत्येक जीवामध्ये त्या एकाच देवाची ज्योत आहे. त्यामुळे कोणताही भेदभाव चुकीचा आहे. ही विचारसरणी सामाजिक समतेचे मूलतत्त्व ठरली. त्यांनी देवाच्या कृपेचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक मनुष्य प्राणी मग तो कुणीही असो परमेश्वराचा अंश आहे. त्यांच्या कार्यातील सर्वात प्रभावी आणि क्रांतिकारी कल्पना म्हणजे 'लंगर' होय. सामूहिक भोजनाची परंपरा, लंगरात सर्व धर्म, जाती, स्त्री-पुरुष एकत्र बसून एकसमान पद्धतीने जेवतात. लंगर हे केवळ अन्नदान नाही, तर सामाजिक समतेचे सशक्त प्रतीक आहे. या उपक्रमातून त्यांनी उच्चनीचतेची भिंत पाडली आणि सामाजिक ऐक्य निर्माण केले. आजही जगभरातील गुरुद्वारांमध्ये चालणारा लंगर हा मानवतेचा, सेवाभावाचा आणि समतेचा जिवंत वारसा आहे.गुरु नानक देव यांनी धर्माच्या नावाखाली होणाऱ्या ढोंगीपणाला व पाखंडाला आव्हान दिले. त्या काळातील धार्मिक नेते लोकांना देवाची भीती दाखवून त्यांच्या श्रमावर जगत होते. त्यांनी स्पष्ट सांगितले की, देवाला प्रसन्न करण्यासाठी दान, यज्ञ, हवन, आडंबराची आवश्यकता नाही; खरा धर्म म्हणजे प्रामाणिक आचरण, करुणा, आणि सत्याशी निष्ठा होय. त्यांनी धर्माचा अर्थ पुन्हा परिभाषित केला. 'धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा बंध आहे, विभाजक नव्हे.' त्यांनी धर्माला सामाजिक नैतिकतेचा पाया बनवला. गुरु नानक देव हे स्त्रीसमानतेचेही प्रवर्तक होते. त्या काळात स्त्रियांना समाजात कनिष्ठ स्थान होते. पण त्यांनी ठामपणे सांगितले की 'सो क्यों मंदा आखिए, जित जमे राजान.' म्हणजे जी स्त्री राजांना जन्म देते, ती कशी कनिष्ठ असू शकते? त्यांनी स्त्रियांना समाजातील समान स्थान देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांच्या विचारांमुळे पुढे शीख धर्मात स्त्रियांना धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मान्यता मिळाली. हे त्या काळातील समाजासाठी अत्यंत प्रगतिशील विचार होते. त्यांनी 'सेवा' या तत्त्वावर आधारलेली एक संस्कृती निर्माण केली. त्यांच्या मते, 'ईश्वराची सेवा म्हणजे मनुष्य प्राण्याची सेवा होय. त्यांनी गरीब, वंचित, पीडित यांच्यासाठी कार्य करणे हेच धर्माचे खरे सार मानले. त्यांनी सांगितले की, समाजातील दु:ख कमी करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या सामर्थ्याने योगदान दिले पाहिजे. या सेवाभावातूनच शीख धर्मातील 'सेवा' आणि 'संगत' या दोन संकल्पना निर्माण झाल्या. संगत म्हणजे सामूहिक प्रार्थना आणि सहजीवनाचा भाव, तर सेवा म्हणजे नि:स्वार्थपणे कार्य करणे. या दोन्ही कल्पनांनी समाजात बंधुभाव आणि सहकार्याचे वातावरण निर्माण केले.गुरु नानक देव यांनी समाजात श्रमाचा सन्मान वाढवला. त्यांनी सांगितले की 'घाळ खाए किछ हातहु दे, नानक राहु पछाणे से.' म्हणजे जो स्वत: परिश्रम करतो आणि इतरांना देतो, तोच योग्य मार्ग ओळखतो. त्या काळात श्रम करणाऱ्यांना समाजात नीच मानले जात होते, पण त्यांनी सांगितले की श्रम म्हणजेच साधना. या विचारांनी श्रमिक वर्गाला आत्मसन्मान आणि सामाजिक प्रतिष्ठा दिली. त्यांनी समाजाला शिकवले की परिश्रमाशिवाय अध्यात्म शक्य नाही. गुरु नानक देव यांनी आपल्या जीवनात चार प्रमुख प्रवास केले. भारताच्या विविध भागांपासून ते अरब, तिबेट, श्रीलंका, चीनपर्यंत. या प्रवासांमध्ये त्यांनी विविध धर्म, पंथ, आणि संस्कृतींच्या लोकांशी संवाद साधला. त्यांनी सर्व धर्मांच्या श्रेष्ठ तत्त्वांना मान्यता दिली आणि सर्वांमध्ये एकतेचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की सत्य आणि प्रेम हाच प्रत्येक धर्माचा मूळ गाभा आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये सर्वधर्मसमभावाचे अधिष्ठान आहे. त्यांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर, ते 'समावेशक समाजरचना' (inclusive society) निर्माण करण्याचा आराखडा होते. त्यांनी सांगितले की समाज हे धर्म, जात, लिंग या आधारांवर नव्हे, तर समानता, सहकार्य, आणि न्याय या मूल्यांवर उभे राहिले पाहिजे. त्यांनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या नैतिक जबाबदाऱ्या अधोरेखित केल्या. त्यांनी धर्म आणि समाज यांचा मेळ घालून एक सामाजिक चळवळ निर्माण केली. त्यांच्या शिकवणीत आर्थिक न्याय या संकल्पनेलाही महत्त्व आहे. त्यांनी श्रीमंत-गरीब यांच्यातील विषमता नाकारली आणि 'वंड छको' या तत्त्वाद्वारे संपत्तीचे समान वाटप करण्याचा संदेश दिला. त्यांनी लोभ, स्वार्थ आणि शोषणाला पाप ठरवले. त्यांच्या विचारांमध्ये सामूहिक समृद्धीची कल्पना आहे. आजच्या काळातील 'सामाजिक समता' आणि 'आर्थिक न्याय' या संकल्पना त्यांच्या शिकवणीशी पूर्णपणे सुसंगत दिसतात.गुरु नानक देव यांची समाजदृष्टी सर्वसमावेशक, वैज्ञानिक आणि आधुनिक होती. त्यांनी शिक्षण, आत्मविकास, सत्यशोधन आणि सामाजिक जबाबदारी यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला. त्यांच्या विचारांमध्ये पर्यावरणीय समतोलाचाही गाभा आहे. त्यांनी सांगितले की 'हवा गुरु, पाणी पिता, माता धरत महत.' म्हणजे निसर्गातील प्रत्येक घटक आपला नातेवाईक आहे. त्यामुळे निसर्गाचा सन्मान करणे हेही धर्माचेच रूप आहे. आजच्या युगात, जेव्हा समाजात असहिष्णुता, भेदभाव, धार्मिक दुरावा आणि नैतिक अध:पतन वाढले आहे, तेव्हा गुरु नानक देव यांचे तत्त्वज्ञान अधिकच अर्थपूर्ण वाटते. त्यांनी दाखवलेला मार्ग केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक पुनर्जागरणाचा आहे. त्यांनी माणसामाणसात प्रेम आणि सहकार्याची भावना निर्माण केली. त्यांनी सांगितले की समाजाचा खरा विकास तेव्हाच शक्य आहे, जेव्हा प्रत्येक व्यक्ती इतरांसाठी जगते आणि इतरांच्या हितासाठी कार्य करते. गुरु नानक देव जयंती म्हणजे केवळ धार्मिक सण नाही, तर मानवतेच्या पुनरुज्जीवनाचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, धर्माचा सार माणसाच्या कल्याणात आहे, विधी-विधानात नव्हे. त्यांनी दिलेले 'नाम, किरत, वंड' हे त्रिसूत्र आजही समाजजीवनाचे दिशा-तत्त्व ठरू शकते. त्यांनी शिकवले की समाजात एकमेकांविषयी आदर, प्रेम, समानता आणि करुणा हीच खरी ईश्वरभक्ती आहे.शेवटी असे म्हणता येईल की गुरु नानक देव हे केवळ शीख धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते मानवतेचे जागतिक प्रवक्ते होते. त्यांनी दाखवलेला मार्ग कालातीत आहे, जो प्रत्येक माणसाला स्वत:च्या अंत:करणाशी जोडतो आणि समाजाशी नाते घट्ट करतो. त्यांचे विचार आजही समाजाच्या आत्म्याला नवी ऊर्जा देतात. त्यांच्या शिकवणुकीचा अर्थ असा की, माणूस हेच देवाचे सर्वश्रेष्ठ रूप आहे. म्हणूनच गुरु नानक देव जयंती साजरी करणे म्हणजे त्यांच्या तत्त्वांचा अंगीकार करून समाजात प्रेम, समानता आणि सेवा या मूल्यांचा पुन:प्रकाश प्रज्वलित करणे होय.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**
**bagate.rajendra5@gmail.com**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002